
# उद्योग विशेषांक




जळगांव
# तरुण भारत
४, पहिला मजला, गोलाणी मार्केट, जळगाव, दूरध्वनी : ०२५७-२२४२०३१/३३

# खान्देशाचे वैभव: जैन उद्योगसमूह

शब्दांकन
**किशोर कुळकर्णी**

१९६३ साली, अगदी सुरुवातीपासूनच श्री. भवरलालजी जैन यांनी शेती हाच आपला व्यवसाय मानला. १९६३ ते १९७८ या दरम्यानचे काळात त्यांनी खते, बी-बियाणे, जंतुनाशके, ट्रॅक्टर्स आणि सिंचनासाठी लागणाऱ्या पंपांसाठी लागणारं हलकं डिझेल तेल अशा प्रकारच्या शेतीत योगदान देणाऱ्या जिनसांच्या वितरणाचे काम केले.

१९७८ साली एका शेती उत्पादनाचे सहाय्यानेच त्यांनी आपल्या औद्योगिक कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. शेतांमध्ये पपयांची लागवड करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले व त्यांपासून मिळणाऱ्या 'पपई-दुधास' त्यांनी भावाची खात्रीही दिली. अशा वापरानं, खरवडलेल्या विद्रूप पपयाही त्यांनी कँडी, टूटी, फ्रुटी बनविण्यासाठी खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यांनी पपई दुधाची खरेदी सुरु केल्यानं शेतकऱ्यांना एक अधिक उत्पन्नाचा मार्ग तर मोकळा झालाच वर त्यांचा नफाही वधारला. खरोखरच त्यांनी महाराष्ट्रात आणि गुजरात, मध्यप्रदेश अशा लगतच्या राज्यांमधील सुमारे २५०० च्या वर शेतकऱ्यांना करार तत्वावर पपईची शेती करण्यास प्रवृत्त केले. पपईच्या दुधापासून प्रक्रियेनं पपेन नावाचं एन्झाइम तयार केलं गेलं आणि १९७८ पासून ते २००२ पर्यंत त्याची सातत्याने १०० टक्के निर्यात केली गेली. अशुद्ध पपेनला प्रति किलो सुमारे रु. २०/- असा भाव मिळत होता. सरतेशेवटी, अतिशुद्ध स्वरुपाचे पपेन रु. ३००० प्रति किलो या भावाने निर्यात केले गेले. अशाप्रकारे 'पपेन' हेच त्यांचे पहिले-वहिले शेती आधारित १०० टक्के निर्यातीभिमुख असे औद्योगिक साहस ठरले.



१९८० साली मुख्यत्वे करुन शेतीमधील सिंचनासाठी त्यांनी पीव्हीसीचे पाईप्स बनविण्यास सुरुवात केली. त्यांनी यात पदार्पण करण्याआधी मोठ्या शहरात त्यांच्या उत्पादनांचे बस्तान बसविलेले तीन उत्पादक आधीच हजर होते. तथापि, या उत्पादकांचा चेहरा-मोहरा शेतीशी जुळणारा असा नव्हता. शहरात बस्तान बसविलेल्या उत्पादकांपेक्षाही अगदी आगळी-वेगळी अशी आपली स्वतःची विपणन शैली भवरलालजींनी अवलंबिली. महाराष्ट्राच्या अगदी तळागाळापर्यंत आणि आजुबाजूच्या राज्यांमध्ये जिल्हास्तरावर त्यांनी वितरक नेमले. शेती-सिंचनासाठी पीव्हीसी पाईप लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी एक विस्तृत असा विस्तार कार्यक्रम हाती घेतला. यामुळे ग्रामीण विपणनाचे विषयात एक प्रकारची क्रांतीच घडून आली म्हणानात! पीव्हीसी पाईपांच्या वापरानं गळतीमुळं वाया जाणाऱ्या पाण्याची तसेच बाष्पीभवनानं उडून जाणाऱ्या पाण्याची बचत झाली. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी द्याव्या लागणाऱ्या पाण्याच्या मात्रा व गुणवत्तेवरही एकप्रकारे नियंत्रण

ठेवण्याची क्षमता प्राप्त झाली.
पीव्हीसी पाईप्स इतके लोकप्रिय झाले की, १९८० साली जेमतेम ५०० मे. टन इतकं सालीना उत्पन्न असणारे हे पाईप्स १९८४ साली चक्क सालीना २३००० टन इतके विकू लागले. भवरलालजींनी पहिल्या दिवसापासूनच कमीत कमी नफा व जास्तीत जास्त उलाढाल हे तत्व उरी बाळगले होते. कच्च्या मालाच्या किमतीमध्ये वाढ होऊनही जवळ-जवळ पांच वर्षांच्या कालावधित त्यांनी पीव्हीसी पाईपांच्या किंमती एकाच पातळीवर राखून त्यांमध्ये एकप्रकारे स्थैर्य आणले. अशाप्रकारे त्यांचे पीव्हीसी पाईपांच्या बाजारातील पदार्पण हे एकप्रकारे ऐतिहासिक असेच झाले. म्हणून अगदी कमी कालावधितच संपूर्ण देशभरात मिळून अशाप्रकारची सुमारे १५० आस्थापने अस्तित्वात आली. श्री. भवरलालजींच्या दैदीप्यमान यशानं लघुउद्योगांना प्रोत्साहन मिळावं हे ही नैसर्गिकच म्हणावं लागेल. पीव्हीसी पाईपांच्या सर्वदूर वापरांमुळे पाणी वाहून नेताना होणाऱ्या नुकसानीत झालेल्या बचतीनं तसंच शेतीत निघणाऱ्या पिकात वाढ झाल्यानं साहजिकच शेतकऱ्यांच्या सुबत्तेत निश्चितच वाढ झाली.

शेतीशी असलेल्या त्यांच्या बांधिलकीचाच एक नैसर्गिक अविष्कार म्हणजे त्यांनी घेतलेला पाणी वाचविण्याचा तसेच शेतीतील उत्पादन क्षमता वाढविण्याचा शोध व त्यासाठी असलेल्या सोयीस्कर तंत्रज्ञानाचा केलेला पाठपुरावा. अगदी सन १९८२-८३ इतक्यात फार आधीपासूनच भारत सरकारने ठिंबक व तुषार सिंचनास उत्तेजन देण्याच्या हेतूने एक अनुदान योजना प्रायोजित केलेली होती. सन १९८६ च्या अखेरीस महाराष्ट्र शासनाने देखील अशाच प्रकारची एक योजना राबविली होती. तथापी, अशाप्रकारच्या अनुदान योजना अस्तित्वात असून देखील सन १९७७-७९ सालापर्यंत महाराष्ट्रात केवळ ४०० हेक्टर्स तर संपूर्ण भारतात जेमतेम ६०० हेक्टर्स एवढ्याच जमिनीवर ठिंबक संच लागले होते. त्यातही आयात केलेले माल सामान वाटप झाले होते आणि कोणत्याही प्रकारच्या सेवा पुरवल्या जात नव्हत्या. या पद्धतीमुळं त्याच्या प्रसारावर अर्थातच मर्यादा पडत होत्या. ह्या चित्रात १९८८ साली जैन इरिगेशनने पदार्पण करताक्षणीच जमीन-अस्मानाचा फरक पडला.

अगदी सुरुवातीपासून श्री. भवरलालजींनी एकसंध असा दृष्टीकोन ठेवला. केवळ नळ्या आणि गाळण यंत्रणांचे उत्पादन गुणवत्तापूर्ण रीतीने करणे आणि त्यांची विक्री करणे एवढ्यावरच भागणार नव्हते तर त्याचबरोबर शेतकऱ्यांना विक्रीपूर्व तसेच अभियंत्यांच्या ठराविक काळानंतर होणाऱ्या हमखास निरीक्षण भेटी, प्रशिक्षित हुशार चालकांची तरतूद, जमविलेल्या माहितीच्या आधारे, यशोगाथांद्वारे, पत्रकांमधून, चर्चासत्रांद्वारे, प्रदर्शनांच्या माध्यमांतून, फलकांचेद्वारे आणि प्रात्याक्षिकांद्वारे शिक्षण देण्याचा अंतर्भाव होता. शेतातील माती, पाणी आणि शेती-हवामानाच्या परस्पर संबंधांचा तौलनिक अभ्यास करुन मगच बसविल्या जाणाऱ्या सिंचन संचाची सखोल माहितीची संगणकीय योजना तयार करण्यासाठी लागणाऱ्या सेवांसह मूलभूत सेवा म्हणजे शेतीचा सर्व्हे-नकाशा, माती-पाणी परीक्षण याही सेवा दिल्या जात होत्या.

याचेच जोडीला शेतकऱ्यांमध्ये, नोकरशाहींमध्ये, समाज सेवकांमध्ये तसेच मत बांधणी करणाऱ्यांमध्ये एकप्रकारची जागरुकता निर्माण व्हावी म्हणून एक जबरदस्त कार्यक्रम हाती घेण्यात आला. कर्तव्यभावनेनं झपाटून शेतकऱ्यांचे मेळावे, प्रशिक्षण वर्ग, भेटीगाठींची मोहीमच चालवली गेली. त्यापाठोपाठ अशाप्रकारांसाठी एक कायम कार्यकर्ती संस्थाच उभारली गेली. सिंचनाचे वेळापत्रक आणि विविध पिकांबरहुकूम पाणी गरजा यांचे तक्तेच एक कायमस्वरुपी संदर्भ म्हणून देण्यात आले. ही सर्व यंत्रणा शेतकऱ्याचे दारी नेऊन पोहचविण्यात आली. सुरुवाती सुरुवातीला, कंपनीच्या प्रशिक्षित माणसांनीच नळ्या पसरवणे, जोडणे, तपासणे-चांचण्या घेणे, बसविणे आणि चालू करणे ही कामे केली. चालविण्याचे शिक्षण देणारी पुस्तिकाही दिली गेली. अगदी संकल्पनेपासून ते थेट चालू करण्यापर्यंत एक बेतून घडवलेली यंत्रणा अशी जाग्यावर सुरु करण्यापर्यंत राबवली. अशाप्रकारे, एक पूर्णपणे शास्त्रशुद्ध आणि या भारत देशात ठिंबक यंत्रणा राबविण्यात बिनीचे काम त्यांनी प्रस्थापित केले.

आत्तापर्यंत जवळजवळ भारतातील प्रत्येक राज्यातून आलेल्या ६१८ शेतकरी समूहांनी इथे प्रत्यक्ष भेट दिलीय आणि किमान ७७,००० शेतकऱ्यांनी संपर्क साधलाय तरी किंवा अशा कार्यक्रमांमध्ये सहभाग तरी घेतलाय. संशोधन व विकास शेतीला १६५०० विद्यार्थ्यांनी भेटी दिल्यात तर बीडीओ, एडीआर, ग्रामसेवक अशा शासकीय अधिकाऱ्यांची संख्या भेट देणाऱ्यांमध्ये, प्रशिक्षित केलेल्यांप्रमाणे आहे. महाराष्ट्राच्या लगत

असणाऱ्या अनेक राज्यांच्या शेती मंत्र्यांनीही इथल्या आस्थापनांना भेटी दिल्या आहेत. परदेशी मंत्री देखील हायटेक ॲग्री इन्स्टीट्युटला भेट देऊन गेले. त्यात आफ्रिका, अफगाणिस्तान, श्रीलंका, मॉरीशस यांचा समावेश आहे. या राज्यातील शेतकरी देखील प्रशिक्षणास येऊन गेले. इथं येऊन वस्तुस्थिती जाणून घेण्याचे इच्छेनं आलेल्या नामवतांमध्ये उपराष्ट्रपती श्री. भैरोसिंग शेखावत, माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखर, उपपंतप्रधान श्री. देविलाल तसेच भूतपूर्व पंतप्रधान आणि विद्यमान केंद्रीय मंत्री तसेच मुख्यमंत्री आणि अन्य मंत्रीगण, विविध राज्यांचे राज्यपाल यांचा समावेश होतो. एवढे भीमकाय प्रयत्न केल्यामुळंच १९८८ साली जेमतेम ६०० हेक्टर्स असलेलं ठिंबक सिंचनाखालचं क्षेत्र २००७ साली ७ लाख हेक्टर्सवर पोचलंय. आजमितीस या उद्योगाची वाढ दरवर्षी सुमारे १ ते १.२ लाख हेक्टर्स या प्रमाणात होते आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यामध्ये जळगावात केळीसाठी, नाशिकमध्ये द्राक्षांसाठी, सोलापूर जिल्ह्यात डाळिंबासाठी सिंचन व्यवस्था जवळजवळ केवळ ठिंबक मार्फतच होते आहे. याचे जोडीला विदर्भातले शेतकरी फलोद्यानासाठी तर मराठवाड्यातील कपाशीसाठी आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी उसासाठी, गुजरातेत व मध्यप्रदेशात मिरची व बटाट्यांसह देशातील ४५ पिकांवर प्रामुख्यानं याच ठिंबक प्रणालीवर विसंबून राहतात.

याच मार्ग शोधक धडपडींनी श्री. भवरलाल जैन यांच्या आयुष्याचा आणि कर्तृत्वाचा बराचसा भाग व्यापला आहे. जिथं अशाप्रकारचे कोणतेच उद्योग मुळातच अस्तित्वात नव्हते त्या ठिकाणी त्यांना एका नव्या शेती उद्योगांची उभारणी करण्यात यश लाभलं. क्रांती तर झालीच झाली. जगाच्या ठिबक नकाशावर भारताला क्र. २ चं स्थान मिळवून देण्यात सिंहाचा वांटा, निश्चितपणे श्री. भवरलालजींनाच द्यावा लागेल व त्यांच्या कंपनीलाही. जैन इरिगेशन म्हणजे ठिंबक सिंचन असं गणित पक्कं झालंय. म्हणूनच, ही आणि या सारख्या इतर यशांची पावती फक्त भारत सरकारनं आणि महाराष्ट्र राज्य शासनानंच नव्हे तर आंतरराष्ट्रीय समुदायानंही राजरोसपणे दिली आहे. शेतीमधील जैव तंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कामगिरी करणारा



आणि एकप्रकारे प्रगतीमधील मैलाचा दगड मानावा लागेल तो केळीमधील उती संवर्धनाला. अत्यंत उच्च प्रतीची गुणवत्ता हमीपूर्वक देण्यासाठी एक केळी उती संवर्धन प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी श्री. भवरलाल जैन यांनी असाधारण मेहनत घेतलीय. देशभरातील हजारो शेतकऱ्यांनी यामुळे त्यांचे प्रत्येक घडाचे उत्पन्न सरासरी ११ किलोंपासून थेट २३ किलोंवर नेलंय आणि पीक हाती येण्याचा कालावधी १८ महिन्यांवरुन ११ महिन्यांवर आणलाय. उत्तर पूर्वेकडील राज्ये वगळता हा संदेश सर्व राज्यांत वेगाने पोचतोय. आपापल्या गरजेच्या रोपांची आगाऊ नोंदणी करुन राखीव करणं आणि आपली पाळी येण्याची वाट पाहणं हे आता शेतकऱ्यांच्या अंगवळणी पडलंय.

'ग्रँडनैन' या नावाची उती संवर्धित केळी रोपांची नवी जात व्यापारी तत्त्वावर वितरीत करण्याचा पहिला मान श्री. भवरलालजी जैन यांचेकडे जातो. युरोपांमधील तसेच अमेरिकेमधील बाजारपेठांमध्ये 'ग्रँडनैन' जातीची ताजी पिकली केळी निर्यात करण्याचं त्याचं स्वप्नंही साकार झालंय. स्वतःच्या गरजेपोटी आयात करणारी राष्ट्रे भारतातून अन्य जातींची फारशी केळी घेत नाहीत. अशारीतीने ताज्या पक्व केळ्यांची निर्यात साधून देशाच्या संपत्तीत मोलाची भर तर पडते आहेच शिवाय शेतकऱ्यांच्या उत्पन्नात थेट भर पडली आहे आणि श्री. भवरलालजी जैन यांना आणखी एका पायाभूतबिनीचे काम केल्याचे श्रेय मिळाले. आता सर्व लक्ष नवनव्या जाती आणण्यावरच केंद्रीत आहे. श्री. भवरलालजींना आता कांद्यामध्ये उती संवर्धन यशस्वी करण्यात यश. ■■■■



# सदैव सैनिका पुढेच जायचे!

एका लहानशा शेतकरी कुटुंबातलं बाळकडू घेतलं असल्यानं हात म्हणा वा पायही म्हणा चिखलात भरल्याचं अप्रुप आम्हाला नाहीं!

१९६३ साली शेतीसाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीच्या व्यापारानं आम्ही आमच्या व्यवसायाचा ओनामा केला होता. त्यानंतर पीव्हीसी पाईपांच्या उत्पादनात पदार्पण करत शुद्ध पपेनच्या निर्यातीनं आम्हाला आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झाली.

त्यानंतर लगोलगच ठिबक, तुषार सिंचन आणि पीई पाईपांच्या उत्पादनात आम्ही उतरलो. कांदा निर्जलीकरण आणि फळप्रक्रीया ही आमची पुढची पावलं होती.

उती संवर्धन योगाने आम्ही जैव तंत्रज्ञानात भरारी मारलीय. उज्ज्वल भविष्याची ती नांदी होय.

चिखलात एकदा कां पाय घातला कीं त्याच्या स्पर्शाशी मऊ नातंच निर्माण होतं याचा तुम्हाला कदाचित अनुभव नसावा. आतां मात्र आंम्ही नव्या ताबेदारीच्या माध्यमातून नैसर्गिकरित्याच प्रगत होत आहोत. फक्त एका वर्षातच अमेरिकेतल्या तीन, इस्त्राइल मधील एक, तर भारतातल्या सहा आस्थापनांची खरेदी करुन आम्ही रुपये अठराशे कोटींची उलाढाल पार केलीय. ६०% वर प्रगती करणं हेच आमचं आतां लक्ष्य आहे.

एवढं सगळं असलं तरी **आमचा पाय चिखलातच रुतलाय** असंच वाटत असेल तर मग आहेच रुतलेला! मग नुसता पायच कशाला **आमचा आत्माच चिखलात रुतलाय म्हणाना!**

**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.**

**कल्पना कणापरी... ब्रह्मांडाचा भेद करी®**

वाकोद - जळगाव - लंडन - वॉशिंग्टन...

पो.बॉ. ७२, जळगांव - ४२५००१. ई-मेलः jisl@jains.com; वेबसाईटः www.jains.com

Food Processing

Plastic Sheets

Drip Irrigation USA

Drip Irrigation USA

Drip Irrigation USA

Drip Irrigation ISRAEL

Onion Processing USA

Plastic Sheets USA